आजच खरेदी करा आणि आपला व्यवसाय उभारा !

संपादिका -सारिका भोईटे-पवार

₹१५०

# उद्योग मैत्रीण

उद्योग विषयाला वाहिलेला संपूर्ण महाराष्ट्रभर वितरीत होणारा अंक

www.udyogmaitrin.com

वर्ष १८ वे अंक क्र. १०३ • मे - जून २०२४

swānand
Pathology Laboratory
Precise | Accurate | Perfect
Care, Backed by Science



अक्षय तृतीया विशेषांक

**SCOOP!**

EXCLUSIVE INTERVIEW WITH

**DR. POORVA RANE SURVE**

DIRECTOR - SWANAND PATHOLOGY LAB

मिनरल वॉटर उद्योगात संधीच संधी !

*विचारांच्या वेगाने उद्योग-व्यवसाय*

कर्मचाऱ्यांतील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याची गरज !

**आरोग्य निधीचे आर्थिक नियोजन**

सिबिल स्कोअरचे महत्त्व

# EXCELLING DIAGNOSTICS

Meet Dr. Poorva Rane Surve, the visionary behind Swanand Pathology Lab, where precision meets compassion in healthcare diagnostics. With a steadfast commitment to excellence, Dr. Poorva embodies a harmonious blend of expertise and empathy, revolutionizing the landscape of pathology services.

swānand
Pathology Laboratory
Precise | Accurate | Perfect
Care, Backed by Science



# समर्पणशील साधिका



## डॉ. पूर्वा राणे - सुर्वे

### डायरेक्टर - स्वानंद पॅथॉलॉजी लॅब

जीवन हे एक वस्त्र! त्यात नियतीचे उभे धागे आणि कृतीचे आडवे धागे आहेत. नियतीच्या उभ्या धाग्यांत कृतीचे आडवे धागे मिसळत सुंदर वस्त्र आपण विणले पाहिजे. कर्म व भाग्य हे एका रेषेत आहेत याचे कारण हे की, कृती केल्याशिवाय तुमचे भाग्य उजाडणारच नाही हे लक्षात घ्या. नियतीवर पूर्ण अवलंबून राहू नका. कारण कृती तुम्हालाच करावी लागणार आहे, असं मानणाऱ्या डॉ. पूर्वा राणे- सुर्वे या उच्च विद्याविभूषित, सुसंस्कृत आणि पेशंटसाठी सतत तत्पर असणारे प्रसन्न विलोभनीय व्यक्तिमत्त्व. डॉ. पूर्वा या केवळ 'स्वानंद पॅथॉलॉजी'च्या लॅब डायरेक्टर एवढीच त्यांची ओळख मर्यादित नसून, स्त्री आरोग्यासंदर्भातील व्याख्यात्या देखील आहेत. या व्याख्यानांसाठी प्रवास, त्यासाठी त्या क्षेत्रातील अफाट वाचन करत डॉ. पूर्वा राणे- सुर्वे यांनी आपल्या कार्याचा आलेख सतत उंचावत ठेवला आहे. 'स्वानंद पॅथॉलॉजी लॅब'च्या माध्यमातून हजारो रुग्णांना सेवा देणाऱ्या डॉ. पूर्वा यांना मिळालेले हे यश एका रात्रीत मिळाले नाही. त्यांच्या प्रगतीचा मार्ग संघर्ष व हालापेष्टांनी भरलेला आहे. डॉ. पूर्वा राणे- सुर्वे या अत्यंत तल्लख बुद्धीच्या, जिज्ञासूवृत्तीच्या! त्यांनी जे क्षेत्र निवडले त्यात पूर्ण जीव ओतून काम केले त्यांची संघर्षकथा.




> एकदा जबाबदारी स्वीकारली म्हणजे विचारपूर्वक कृती करावी लागते. कृतीतून सवयी जडतात आणि सवयीतून चारित्र्य घडतं. चारित्र्यातून आपलं भवितव्य ठरतं. ही एक सकारात्मक शृंखला आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण श्रम लागतात. एकाच रात्रीत सारे काही घडू शकत नाही. तसा प्रयत्नही करू नका. यशाचा मार्ग कष्टातूनच जातो तो दीर्घ असतो, हे लक्षात ठेवा.

## डॉ. पूर्वा राणे - सुर्वे

**डायरेक्टर - स्वानंद पॅथॉलॉजी लॅब**

### प्रारंभीचा काळ -

पूर्वा राणे यांचा जन्म डोंबिवलीतील मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. डॉ. पूर्वा यांची आई प्रिया राणे गृहिणी तर बाबा श्री. रघुनाथ राणे हे ऑक्ट्रॉयमध्ये कार्यरत होते. घरात शिक्षणाला महत्त्व होते. डोंबिवली येथील डॉन बॉस्को स्कूलमधून पूर्वा दहावीमध्ये शाळेमध्ये प्रथम आल्या. त्यानंतर मुलुंड येथील वझे केळकर कॉलेजमधून बारावी सायन्स व 2012 साली अहमदनगर येथील मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एमबीबीएस पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. एमबीबीएस करताना डॉ. पूर्वा यांना पॅथॉलॉजी विषयाची विशिष्ट ओढ वाटू लागली. एमबीबीएस नंतर एम.डी पॅथॉलॉजी ही ब्रँच त्यांनी निवडली.

### शासकीय तसेच खाजगी क्षेत्रातील नोकरी -

2014 मध्ये सायन येथील हॉस्पिटल, त्यानंतर टाटा हॉस्पिटलमध्ये 6 महिने पॅथॉलॉजीचे त्यांनी ट्रेनिंग घेतले. 2017 मध्ये एम.डी. पॅथॉलॉजीचे शिक्षण पूर्ण झाले. त्यानंतर बीएमसीच्या एम.टी.अग्रवाल हॉस्पिटलमध्ये काही काळ त्यांनी प्रॅक्टीस केली. शासकीय रुग्णालयामध्ये त्यांना शिकावयास खूप मिळाले. शासकीय रुग्णालयमधील अनुभवानंतर अंधेरी येथील सबर्बन लॅबमध्ये डॉ. पूर्वा यांनी कन्सल्टंट पॅथॉलॉजिस्ट म्हणून कामाचा अनुभव घेतला. मुलगा स्वानंदच्या जन्मानंतर त्याला सोडून रोजचा अंधेरी ते डोंबिवली प्रवास नकोसा वाटत होता म्हणून त्यांनी सबर्बन लॅबच्या ठाणे, उल्हासनगर येथील ब्रॉंच मध्ये काम करण्यास सुरुवात केली.

### आयुष्याला कलाटणी -

डॉ. पूर्वा त्यांच्या पतींजवळ कायम स्वतंत्र लॅब सुरु करावायाची इच्छा प्रदर्शित करत असतं. डॉ. पूर्वा यांचे पती देखील वैद्यकीय क्षेत्रातील. उच्चशिक्षित, विद्याविभूषित डॉ. पंकज चौधरी (प्रख्यात युरोसर्जन) यांचे डोंबिवली येथे स्वतःचे हॉस्पिटल होते. डॉ. पंकज चौधरी यांना कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये कोविडने ग्रासले आणि त्यांची प्राणज्योत मालवली. आयुष्यात आलेल्या या वादळाने खचून न जाता डॉ. पूर्वा यांनी सर्व शक्ती एकवटून पुनःश्च उभे राहायचे ठरविले. डॉ. पूर्वा यांना आयुष्याचा कठीण पेपर सोडवावा लागला, परंतु संकटाने त्या खचल्या नाहीत. अनामिक अशा धैर्यानं त्या उभ्या राहिल्या. आयुष्यात आलेल्या संघर्षांला त्या धीटपणे सामोरी गेल्या.

### कोरोना महामारीचा सामना-

प्रत्येक वाईट गोष्टींमधून काहीतरी चांगलेच घडत असते त्यावर विश्वास असला पाहिजे. 2020 सालं हे संपुर्ण

जगासाठी भयानक वर्ष ठरलं. संपुर्ण जग कोरोनाच्या दहशतीतच होते. कोरोना महामारी भयंकर होती. कोरोना महामारीने केलेल्या वैयक्तिक घातानंतर कोरोना महामारीमध्ये अजून रुग्ण दगावू नयेत याचा विचार त्यांनी केला. या भयावह अशा परिस्थितीत रुग्णांची कोरोना विषाणूची तपासणी वेळेवर झाली व अचूक रिपोर्ट त्यांना त्वरित मिळाले तर रुग्णांवर पुढील औषधोपचारही तातडीने सुरु होतील, या विचारातूनच स्वतःची स्वतंत्र लॅब सुरु करावी असा मनोनिग्रह केला आणि पती निधनानंतर अवघ्या तेराव्या दिवशी त्यांनी लॅब उभारणीच्या कामाला सुरुवात केली.

### स्वानंद पॅथॉलॉजी लॅबची स्थापना -

डॉ. पूर्वा राणे यांची श्री स्वामी समर्थांवर पूर्ण श्रद्धा आहे. समर्पणाशिवाय काही साधणार नाही, तेव्हा संपूर्ण श्रद्धेनिशी एखाद्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून दिल्याशिवाय काही हाती लागणार नाही असे त्या मानतात. याची प्रचिती लॅब उभारणी करताना आली. डॉ. पकंज चौधरी यांचे स्वतःचे 3500 स्क्वे. फुटाचे हॉस्पिटल होते त्याच जागी पॅथॉलॉजी लॅब सुरु करण्याचे ठरविले. डॉक्टरांच्या हॉस्पिटल्स मधील काही मशिन्स होत्या त्यांची विक्री करुन, लॅबसाठी लागणाऱ्या सुसज्ज मशिन्स घेणे सुरु झाले. बँकेचे आधीचे कर्ज होते, शिवाय नवीन कर्जासाठी त्यांनी बँकेकडे अर्ज केला. लॅब उभारणीचे काम सोप्पे नव्हते. पैशांच्या जुळवाजुळवीसाठी त्यांनी शर्थीने प्रयत्न केले. अखेर बँकेकडून कर्ज मंजूर झाले आणि डॉ. पुर्वा यांच्या पंखात बळ आलं. पॅथॉलॉजी लॅब उभारणीचे काम अगदी युद्धपातळीवर सुरु झाले. वैयक्तिक दुःख तर होतेच आणि मुलगा स्वानंद अगदी दीड वर्षाचा होता, पण हाती घेतलेले तडीस न्यायचे त्यांनी ठरविले. त्यांच्या या विचारांना आई- वडिलांनी पाठिंबा दिला आणि आत्तेभाऊ प्रविण चौधरी याने मदत केली. अवघ्या सहा महिन्यातच 11 डिसेंबर 2020 ला मुलगा स्वानंद याचे नाव लॅबला देत 'स्वानंद पॅथॉलॉजी लॅब' रुग्णांसाठी सुरु झाली. परिस्थितीत एकटीने, एकाग्र चित्ताने आणि धैर्याने परिस्थितीला तोंड देणे असे अनुभव घेत घेत त्यांनी आजवरची मजल गाठली आहे.

### कोविड काळातील कामगिरी -

एखादा ठाम निश्चय करून वाटचाल केल्यास कठीण ध्येयही सहज गाठता येते. स्वानंद पॅथॉलॉजीचा जन्म कोरोना काळातील. कोरोना काळात लॅब सुरु झाल्यामुळे, कोविड तपासणीची परवानगी मिळाल्यामुळे एकीकडे रुग्णांची गर्दीही वाढत होती तर दुसरीकडे स्टाफचे तसेच चाचणीसाठी भीतीदायक चेहऱ्यांचे मनोबल जपणे ही तारेवरची कसरत होती. टीमची दिवसरात्र मेहनत चालू होती, रुग्णांना अचूक रिपोर्ट वेळेवर देण्यासाठी संपुर्ण टीम झटत होती. कोरोना काळात तर डॉ. पूर्वा स्वतः व त्यांची टीम सतत पिपीई किट घालूनच काम करायच्या. प्रोटेक्टीव्ह किट घातल्यानंतर श्वास घेणेही कठीण असायचे, त्यात उकडायचे. अक्षरक्षः घामाने आंघोळच व्हायची. वैयक्तिक दुःखाला बाजूला ठेऊन टीमला सांभाळात अत्यंत भयावह परिस्थितीत एकमेकांना धीर देण्याचे काम चालू होते. तसेच पेशंटची विश्वासहर्ता जपत, वेळेत अचूक रिपोर्ट देण्याचे काम चालू होते. अनेक तणावग्रस्त, भीतिग्रस्त रूग्णांशी बोलून, हिंमत देऊन,समुपदेशन करण्याचे कामही डॉ.पूर्वा यांनी केले. समस्त देशवासीय आपल्या घरात कुटुंबासमवेत सुरक्षित असताना कर्तव्यभावनेतून कुटुंबापासून, आप्त स्वकीयांपासून दूर जात अनेक डॉक्टर्सनी सेवाभाव जपला. स्वानंद पॅथॉलॉजीची संपुर्ण टीम कोरोना वॉरियर्स सारखीच दिवसरात्र रुग्णांसाठी झटत होती. लोकांची विश्वासहर्ता जपत त्यांना उत्तमोत्तम सेवा द्यावयाची हेच उद्दिष्ट नजरेसमोर असायचे.

### स्वानंद पॅथॉलॉजी लॅबसंदर्भात -

स्वानंद पॅथॉलॉजी लॅब ही 3500 स्क्वे. फुटाची सुसज्ज लॅब आहे. जिथे पुर्णपणे ऑटोमेटेड मशीन्स आहेत. कोणत्याही लॅबमध्ये केलेल्या चाचण्या महत्त्वाच्या असतात कारण त्या डॉक्टरांना रोगाचा सारांश देतात आणि मानवी शरीरात विकसित होणारा आजार समजून घेण्यास मदत करतात. शिवाय, हे अहवाल डॉक्टरांना रूग्णाच्या स्थितीबद्दल योग्य निर्णय घेण्यास मदत करतात. या सर्व बाबींचे गांभीर्य ओळखून स्वानंद पॅथॉलॉजिमध्ये तपासणीसाठी अचूकता आणि दर्जाला प्राधान्य दिलं जातं. विश्वासाहर्ता जपली जाते. या सगळ्यामुळेच सुरु





होऊन केवळ वर्षभरातच नॅशनल अॅक्रेडीएशन बोर्ड फॉर टेस्टिंग अँड कॅलिब्रेशन या मान्यताप्राप्त संस्थेची मान्यता मिळवणारी 'स्वानंद' ही डोंबिवलीतली पहिली लॅब ठरली.'' स्वानंद पॅथॉलॉजीमध्ये मूलभूत रक्त तपासणीपासून जवळपास सगळ्याच प्रकारच्या तपासण्या केल्या जातात. विशेष म्हणजे गर्भाशयाच्या कर्करोगासाठी (सर्व्हायकल कॅन्सरसाठी) केली जाणारी तपासणी 'पॅप स्मिअर टेस्ट' सुद्धा इथे केली जाते. डॉक्टर स्वतः एक महिला असल्यामुळे येणाऱ्या महिला रूग्ण निसंकोचपणे त्यांच्याशी चर्चा करतात. याशिवाय विवाह पूर्व आरोग्य तपासणीसारखे पॅकेजेस देखील त्यांच्या लॅब मध्ये उपलब्ध आहेत.

### पॅथॉलॉजी लॅबचे व्यवस्थापन -

आपण आपल्या कामाशी प्रामाणिक रहावे. मेहनतीच्या मार्गांनी लक्ष्य साध्य करावे अशी वृत्ती डॉ.पूर्वा यांची आहे. प्रत्येक पावलावर तत्व आणि व्यवहाराचा सुरेख मेळ घालत डॉ. पूर्वा यांनी पॅथॉलॉजी लॅबला सुरळीतपणे चालविले. सातत्याने नवे प्रयोग करणे आणि नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे, यातून त्यांच्या प्रगतीच्या वाटा खुल्या झाल्या.

डॉ. पूर्वा यांच्यामते बऱ्याच ठिकाणी फक्त लॅब उघडलेली असते, पॅथॉलॉजिस्ट नसतात. कमी पैशांचं आमिष दाखवले जाते आणि त्यामुळे रुग्णांची दिशाभूल होते. वास्तविक पाहता पॅथॉलॉजी लॅबमध्ये एक कन्सल्टंट पॅथॉलाजिस्ट असणं खूप महत्त्वाचं असतं. त्यांच्याशिवाय डी.एम.एल.टी कोर्स झालेले लॅब टेक्नीशियन्स त्यांच्या कामाच्या अनुभवानुसार तसेच पदवीप्रमाणे सिनियर आणि जुनियर लॅब टेक्नीशियन्स तसेच लॅबमध्ये फ्लेबोटोमिस्ट म्हणजे रक्त तपासणीसाठी रक्त काढणारा टेक्नीशियन, होमव्हिजीट टेक्नीशियन्स (जे पेशंटच्या घरी जाऊन ब्लड आणि अन्य सॅम्पल कलेक्ट करतात) तसेच लॉजिस्टीक स्टाफ असतात. या सर्वाचा सारासार विचार करुनच स्वानंद पॅथॉलॉजी लॅबचा शुभारंभ त्यांनी केला. स्वानंद पॅथॉलॉजी लॅबमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे डिपार्टमेंट असून सर्व प्रकारचे अनुभवी टेक्नीशियन्स आहेत आणि अचूक दर्जा व योग्य अहवाल ही आमची खासियत आहे.

### सामाजिक उत्तरदायित्व-

आपल्या क्षेत्रात काम करताना मिळणारा आनंद सर्वाधिक असतो. त्याला सामाजिक सुधारणांची जोड असेल, तर या व्यवसायाला मिळणारे अधिष्ठान अधिक महत्त्वाचे ठरते. डॉ. पूर्वा या आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम करत आहेत त्याचसोबत वैयक्तिक प्रगतीबरोबरच सामाजिक उत्तरदायित्व देखील निभावत आहेत. जिथे शक्य आहे तिथे विविध संस्थांमार्फत आरोग्यविषयी जागरूकता वाढावी या करिता त्या अतिशय अल्प दरात आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन, वेगवेगळ्या ठिकाणी मासिक पाळी स्वच्छता तसेच थॅलेसेमिया सारख्या विषयांवर व्याख्यानाचे आयोजन, कार्यशाळांचे आयोजन, महिलांमध्ये वाढत्या स्तनांच्या कर्करोगावर मार्गदर्शन करण्यासाठी जागरुकता शिबिरांचे आयोजन करतात.


### कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठीचा कानमंत्र -

डॉ. पूर्वा यांच्यामते, एकदा जबाबदारी स्वीकारली म्हणजे विचारपूर्वक कृती करावी लागते. कृतीतून सवयी जडतात आणि सवयीतून चारित्र्य घडतं. चारित्र्यातून आपलं भवितव्य ठरतं. ही एक सकारात्मक शृंखला आहे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण श्रम लागतात. एकाच रात्रीत सारे काही घडू शकत नाही. तसा प्रयत्नही करू नका. यशाचा मार्ग कष्टातूनच जातो तो दीर्घ असतो, हे लक्षात ठेवा.









## सतत नाविन्यतेचा ध्यास -

कामांतील आव्हाने पेलायची, नवनवे प्रयोग करायचे आणि यशासाठी अपार मेहनत करायची हे डॉ.पूर्वा यांचे सूत्र. दिवसाचे 24 तास अपुरे पडावेत इतक्या विविध कल्पनांनी व योजनांनी त्या भारावलेल्या असतात. बदल हाच केवळ शाश्वत असतो. नवीन काहीतरी सतत शिकत राहिले पाहिजे या विचारांनी डॉ. पूर्वा या 'इंडियन स्कूल ऑफ बिझनेस'मधून 'हेल्थकेअर मॅनेजमेंट'चा कोर्स करत आहेत. हा कोर्स आरोग्य सेवा क्षेत्रातील उत्पादन आणि व्यवस्थापनाशी संबंधित आहे. 'स्वानंद पॅथॉलॉजी लॅब'चा पसारा वाढविताना या सर्व बाबींचा विचार त्यांनी केला. एचआर मॅनेजमेंट, फायनान्स मॅनेजमेंट, हॉस्पिटल मॅनेजमेंट , लेटेस्ट टेक्नॉलॉजी आणि क्वॉलिटी सर्व्हिसेस अशा अनेक गोष्टींचा अंतर्भाव या अभ्यासक्रमामध्ये होतो.

## रथाचे दुसरे चक्र -

डॉ. पूर्वा यांचा नुकताच पुर्नविवाह झाला असून त्यांचे पती श्री. प्रथमेश सुर्वे हे क्लिनिकल रिसर्च क्षेत्रात कार्यरत आहेत. समंजस वृत्तीच्या प्रथमेश यांची डॉ. पूर्वा यांना उत्तम साथ लाभली आहे. डॉ. पूर्वा आजवरच्या यशाचे श्रेय त्यांच्या आई-वडिलांना, कुटुंबियांना व स्वानंद लॅबच्या संपुर्ण टीमला देऊ इच्छितात.

आयुष्य जगणं म्हणजे नशिबाच्या अफाट समुद्रात आपल्या आयुष्याचे इवलेसे गलबत हाकारत राहणे. आता ते करत असतांना वादळ आलं म्हणून घाबरण्याला काय आणि कितीसा अर्थ आहे? कधी न कधी वादळ हे यायचंच! ज्याला वादळाचं भय वाटत असेल त्यानं आपलं गलबत समुद्रात न लोटणंच चांगलं! कारण वादळ जसं येतं तसंच ते जातं ही, ते काही कायमचं टिकून राहत नाही. उलट वादळाला न भिता, त्याला तोंड देऊन टिकून राहायचं असतं असं मानणाऱ्या डॉ. पूर्वा राणे- सुर्वे म्हणजे नवे नवे विक्रम, यशाची नवी नवी शिखरे! पूर्वा म्हणजे सळसळते चैतन्य आणि पूर्वा म्हणजे धाडस असे समीकरण ठरावे असा डॉ.पूर्वा राणे- सुर्वे यांच्या कार्याचा चढता आलेख आहे. संकटाचा बाऊ न करता त्यावर स्वार होऊन यशसिद्धी प्राप्त करणाऱ्या डॉ.पूर्वा लाखो तरुण तरुणींसाठी आदर्शवतच ठरतात. त्यांना 'उद्योग मैत्रीण' परिवाराकडून शुभेच्छा!